**महाराष्ट्र शासन- जलसंपदा विभाग**
**समन्वय समिती**
**गट (ब) अराजपत्रित व गट-क सरळसेवा भरती**

**जा.क्र.दप/पमं/सरळसेवा/समन्वय समिती/मेज-२/७१/ सन २०२४** **दि.: ०९.०२.२०२४**

# प्रसिध्दीपत्रक

१. जलसंपदा विभागांतर्गत गट ब (अराजपत्रित) व गट क संवर्गातील परीक्षा- २०२३ राज्यातील १२६ परीक्षा केंद्रामध्ये दिनांक २७.१२.२०२३, २९.१२.२०२३, ३१.१२.२०२३, ०१.०१.२०२४ व ०२.०१.२०२४ या तारखांना आयोजित करण्यात आलेली होती. परिक्षा झाल्यानंतर मे. टि.सी.एस. आय.ओ.एन. यांचेकडून दि.०५.०१.२०२४ पासून संबंधित उमेदवाराच्या लॉगिन आय.डी. वर त्या उमेदवाराने सोडवलेली उत्तर पत्रिका (Answer Sheet) व उत्तर तालिका (Answer Key) उपलब्ध करुन देण्यात आली होती.

२. सदर उत्तरतालिका (Answer Key/Response Key) संदर्भात उमेदवारांना आक्षेप/ हरकती (Objection) असल्यास, त्या नोंदविण्यासाठी मे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांच्याकडून दि.०८.०१.२०२४ ते दि. १०.०१.२०२४ या कालावधीत सर्व उमेदवारांना लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेली होती.

३. जलसंपदा विभागांतर्गत गट ब (अराजपत्रित) व गट क संवर्गातील परीक्षा- २०२३ या संवर्गाकरीता प्राप्त आक्षेपांबाबत मे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या कंपनीच्या तज्ञ समितीमार्फत कार्यवाही करण्यात आलेली असून प्राप्त आक्षेपांचा व त्यापैकी वैध आक्षेपांचा तपशील दि. १४/०२/२०२४ रोजी जलसंपदा विभागाच्या (https://wrd.maharashtra.gov.in) या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करणेत येईल.

४. मे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या कंपनीमार्फत दि. १४/०२/२०२४ रोजी उमेदवारांना त्यांचे लॉग इन आयडी वर सुधारित HTML Link Post Objection (सुधारित उत्तरतालिका) उपलब्ध करुन देण्यात येईल.

५. तद्नंतर मे. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांचेकडून उमेदवारांना प्राप्त गुण व सामान्यीकरण (Normalization) केलेले गुण प्राप्त झालेनंतर गुणवत्ता यादी जलसंपदा विभागाच्या (https://wrd.maharashtra.gov.in) या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत येईल, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**स्थळ प्रत मा. अध्यक्ष समन्वय समिती यांचे मान्यतेने**

(सविता चं. बोधेकर)
सदस्य सचिव
समन्वय समिती तथा
अधीक्षक अभियंता व परिमंडळीय अधिकारी,
दक्षता पथक, मुंबई परिमंडळ
ठाणे